ePaper
कन्हेरी मंदिरात नारळ फोडून बावनकुळे यांची 'बारामती मिशन'ला सुरुवात
| वर्ष - 6 | अंक - 148 | UDYAM-MH-26-0158827 |
# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






बाप्पा मोरया...

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 6 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



स्वतः शिंदे व त्यांच्या लोकावंर ईडी चौकशीचे जोखड होतेच. त्यांच्या बरोबरच्या किमान दहा आमदारांची ईडी चौकशी सुरू होती. म्हणजे भ्रष्टाचार होताच. काहींनी अटकपूर्व जामीन घेतले. या सगळ्यांचा एक राजकीय गट करून त्यांच्याबरोबर भाजपाने महाराष्ट्रात सरकार स्थापन केले. पुन्हा आश्चर्य असे की या गटाचे आमदार सांगतात आम्ही भ्रष्ट असलो तरी न्यायालयाचा निकाल आमच्या बाजूने लागले. निरागस मोदी यांनी या सर्व प्रकरणाचा अभ्यास केला पाहिजे.

**-उद्धव ठाकरे, शिवसेना**

हा सगळा मूर्खपणा आहे. मीडियाला किंवा इतरांना हे नवं सरकार आल्याचं पचत नाही आहे. तुम्हाला सर्वांना माझं शिक्षण माहिती आहे ना? उगाच ११-१२ वीचा पोरगा म्हणून ही दांडकी (मीडियाचे बूम) घेऊन फिरत नाही आहे. मी उच्चशिक्षित आहे. एकदा मी किती संस्था चालवतो, किती कारखाने चालवतो, किती कर्मचारी आहेत, किती दर्जेदार आहेत याची माहिती घ्या. मी काय तुम्हाला अंगठाछाप मंत्री वाटलो का?

**-तानाजी सावंत**



# शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका!

## वाहतूक, चहापान कामातून शिक्षकांची सुटका; ई-पीक पाहणीचा आदेश रद्द

**पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यातील सरकारी शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असतानाही शिक्षकांना अशैक्षणिक काम देणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांना त्यांचे आदेश अखेर रद्द करावे लागले. त्यामुळे या शिक्षकांची अशैक्षणिक कामातून तात्पुरत्या स्वरूपात सुटका झाली आहे. शिक्षकांनी गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांची चहापानाची व्यवस्था आणि वाहतुकीचे नियोजन करण्याचे आदेशही प्रशासकीय यंत्रणेने सुधारित परिपत्रके काढून रद्द केले आहेत. राज्यातील शिक्षकांना ई-पीक पाहणी कार्यक्रम राबविणे, कोकणात गणेशोत्सवासाठी येणाऱ्या चाकरमान्यांची चहापानाची व्यवस्था करणे, वाहतुकीचे नियोजन करणे, महामार्गावरील वाहतूक व्यवस्थेवर नजर ठेवणे, चेकपोस्ट आणि जेट्टीवर वाहतुकीचे नियोजन करणे आदी अशैक्षणिक कामे सोपविण्यात येत आहेत. त्यामुळे राज्यातील शिक्षकांनी प्रशासकीय यंत्रणेवर संताप व्यक्त केला असून, या कामांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले.

तत्पूर्वीही, 'मनस्तापाची शाळा'या वृत्तमालिकेद्वारे शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामांवर प्रकाश टाकण्यात आला होता. या कामांना शिक्षक संघटनांचा वाढता विरोध पाहता 'ई-पीक'पाहणी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी, शिक्षकांनी पालक सभा घ्याव्यात; तसेच स्नेहसंमेलनांमध्ये जनजागृती करावी, हा आदेश जामनेरच्या (जळगाव) तहसीलदारांना रद्द करावा लागला आहे. या पाठोपाठ गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांची राजापूर बसस्थानकात चहापानाची व्यवस्था करणे आणि वाहतुकीचे नियोजन करणे, असा आदेश देणारे राजापूर (रत्नागिरी) पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्यावर त्यांचेच आदेश रद्द करण्याची वेळ आली. त्याचप्रमाणे मंडणगड तालुक्यातील म्हाप्रळ जेटी परिसरातील; तसेच लांजा चेकपोस्टवरील वाहतूक कोंडी दूर करण्याचे आदेशही रद्द झाले.



### तर, हिवाळी अधिवेशनावर मोर्चा

**शिक्षकांची सध्या अशैक्षणिक कामांमधून सुटका झाली असली, तरी सरकारकडून पुन्हा या कामांची जबाबदारी शिक्षकांवर टाकली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पुढील १५ दिवसांत प्रशासकीय यंत्रणांना निवेदनाद्वारे शिक्षकांचे म्हणणे पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. हे करूनही प्रशासकीय यंत्रणांना जाग आली नाही, तर नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर शिक्षकांचा मोठा मोर्चा काढण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे सरचिटणीस विजय कोंबे यांनी दिली.**

# आमदार नितेश राणे यांच्या पत्नीच्या वाहनाला किरकोळ अपघात

## कोणीही जखमी झाले नसून गाडीचे नुकसान

**पिंपरी**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

आमदार नितेश राणे यांच्या चारचाकी वाहनाला अपघात झाला. यात कोणीही जखमी झाले नसून गाडीचे नुकसान झाले आहे. पुणे -मुंबई द्रुतगती मार्गावर सोमवारी (दि. ५) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, नितेश राणे यांच्या चारचाकी वाहनातून त्यांचे कुटुंबीय मुंबई येथून पुण्याच्या दिशेने जात होते. उर्से टोल नाका येथे एका ट्रकने राणे कुटुंबीयांच्या वाहनाला पाठीमागून धडक दिली. यात गाडीचे नुकसान झाले.

गाडीत नितेश राणे यांच्या पत्नी ऋतुजा राणे आणि कुटुंबीय होते. यातील कोणीही जखमी झाले नाही. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ट्रक चालकाला ताब्यात घेतले. अपघात झालेल्या या गाडीत नितेश राणे नव्हते. अपघात प्रकरणी शिरगाव परंदवाडी पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

**शिरगाव परंदवडी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, नितेश राणे यांच्या चारचाकी वाहनातून त्यांचे कुटुंबीय मुंबई येथून पुण्याच्या दिशेने जात होते. उर्से टोल नाका येथे एका ट्रकने राणे कुटुंबीयांच्या वाहनाला पाठीमागून धडक दिली. यात गाडीचे नुकसान झाले. गाडीत नितेश राणे यांच्या पत्नी ऋतुजा राणे आणि कुटुंबीय होते. यातील कोणीही जखमी झाले नाही.**



# पुणे पोलिसांची भारत- पाक सामन्यादरम्यान मोठी कारवाई!

## लाखो रुपयांचा सट्टा लावणारा पबमधून अटकेत; मोबाइल, रोकड जप्त

।पुणे। महाईन्यूज ।

भारत – पाकिस्तान क्रिकेट सामन्यावर लाखो रुपयांचा सट्टा घेणाऱ्याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतले आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ‘डी मोरा’ पबमध्ये सट्टा लावण्यात आला होता. तेथून लाखो रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. तसेच मोबाइल, सट्टा लावण्यासाठी आवश्यक साहित्य ताब्यात घेण्यात आले. गुन्हे शाखेने रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास ही कारवाई केली.

श्रीपाद यादव असे ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव आहे. डी-मोरा पबमध्ये क्रिकेट सामन्यावर सट्टा घेणात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पथकाने रात्री उशिरा पबमध्ये छापा टाकून श्रीपाद यादवला ताब्यात घेतले. तो पबमध्ये क्रिकेट सामन्यावर घेऊन सट्टा घेत असल्याचे उघडकीस आले. तेथून लाखो रुपयांची रोकड, मोबाइल, साहित्य जप्त केले आहे.




**श्रीपाद यादव असे ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव आहे. डी-मोरा पबमध्ये क्रिकेट सामन्यावर सट्टा घेणात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पथकाने रात्री उशिरा पबमध्ये छापा टाकून श्रीपाद यादवला ताब्यात घेतले. तो पबमध्ये क्रिकेट सामन्यावर घेऊन सट्टा घेत असल्याचे उघडकीस आले. तेथून लाखो रुपयांची रोकड, मोबाइल, साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, कोट्यवधी रुपयांचे व्यवहार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त श्रीनिवास घाडगे, गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकांनी ही कारवाई केली.**

याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, कोट्यवधी रुपयांचे व्यवहार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त श्रीनिवास घाडगे, गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकांनी ही कारवाई केली.

भारतीय संघाला रविवारी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेतील ‘अव्वल चार’ फेरीच्या सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. मोहम्मद रिझवान (५१ चेंडूंत ७१ धावा) आणि मोहम्मद नवाज (२० चेंडूंत ४२) यांच्या फटकेबाज खेळींमुळे पाकिस्तानने पाच गडी आणि एक चेंडू राखून सरशी साधली.



## भोंग्याच्या मुद्द्याचं पुढे काय झालं ? विरोधीपक्षनेते अंबादास दानवे यांचा राज ठाकरेंना सवाल

।पुणे। महाईन्यूज ।

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज शिवसेना नेत्या, उपसभापती नीलम गोऱ्हे यांची पुणे इथे त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली, त्यांच्या घरी गणपतीचे दर्शन घेतले. या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना भाजपाला लक्ष्य करतांना राज ठाकरेंवर सडकून टीका केली आहे.

“मागील लोकसभा निवडणुकीत लाव रे तो व्हिडिओ म्हणणारे,त्यातून कोणाची बदनामी केलीकोणाचा व्हिडिओ लावला, भोंगे त्याबाबत काय झालं? त्यामुळे कोण ते ठाकरे, त्या ठाकरेंचं महत्त्व काय,शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ज्यांना सांगितलं, ते उद्धवजी ठाकरे,आदित्यजी ठाकरे आहेत. बाकीचे असतील माहिती नाहीत” अशा शब्दात दानवे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. मुंबई महापालिकेत १५० जागा निवडून आणण्याचं लक्ष्य भाजापाने ठेवलं आहे. त्यावर अंबादास दानवे म्हणाले की मागील निवडणुकीत देखील अशीच घोषणा त्यांच्याकडून करण्यात आली होती. त्यावेळी नरेंद्र मोदी यांचा करिष्मा होता.तसेच तेव्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते.

आता ते उपमुख्यमंत्री आहेत. काही होणार नसून शिवसेना केवळ निवडणुका आल्या की काम करीत नाही तर ३६५ दिवस शिवसैनिक काम करीत असतो.त्यामुळे शिवसेनाचा विजय कोणीही थांबू शकत नाहीअशा शब्दात दानवे यांनी भाजपावर टीका केली आहे.

# उद्वाहक (लिफ्ट) सेफ्टी ऑफिसर प्रकाश पाटील यांचे एक्झर्बिया अबोडवासियांना अनमोल मार्गदर्शन

## विद्युत सुरक्षा : लिफ्ट आणि सुरक्षा, इमारतींच्या उद्वाहक (लिफ्ट) बाबत समज गैरसमज...

**। वडगाव (मावळ) पुणे । महाईन्यूज । गणेश क्षिरसागर**

सध्या संपूर्ण देशात बांधकाम क्षेत्र कमालीचे विस्तारले आहे, जागेची कमतरता असल्यामुळे उंच टॉवर्स आणि हाय राईज बिल्डिंग्जची संकुले बांधण्याकडे बांधकाम व्यावसायिक जास्त भर देत आहेत. आजच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करणाऱ्या या संकुले व टाऊनशिप्सची निर्मिती हे एक मोठेच आव्हान असतं; त्यासाठी आवश्यक असते दूरदृष्टी, नियोजन, प्रचंड जबाबदारी पेलण्याची तयारी आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे भक्कम आणि भरवशाची साथ! यातच महत्त्वाची बाब म्हणजे विद्युत सुरक्षा आणि ‘लिफ्ट’ अर्थात उद्वाहन. इमारतींच्या उद्वाहक (लिफ्ट) बाबत समज गैरसमज. या विषयावर रविवार दिनांक 4 सप्टेंबर 2022 रोजी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास तब्बल 22 वर्षे अनुभव असलेले उद्वाहक



(लिफ्ट) सेफ्टी ऑफिसर प्रकाश पाटील यांचे एक्झर्बिया अबोडवासियांना अनमोल मार्गदर्शन केले. वडगाव (मावळ) येथील जांभुळगाव येथील एक्झर्बिया अबोड सोसायटीमधील गणेशोत्सव मंडळाच्या वतीने उद्वाहक (लिफ्ट) बाबत समज गैरसमज... या विषयावर प्रबोधनात्मक, मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या दरम्यान प्रकाश पाटील बोलत होते.यावेळी सोसायटीमधील महिला-पुरुष, लहानग्यांनी उपस्थित राहून लिफ्टबाबत आपल्या शंकाचे निरसन केले. यावेळी पुढे बोलताना पाटील म्हणाले की, लिफ्टमध्ये अडकल्यास घाबरण्याचे काहीही कारण नाही. माणूस गुदमरत नाही. कारण ऑक्सिजन आतमध्ये जायला तशी व्यवस्था लिफ्टमध्ये असते. अशा वेळी अलार्म हे बटन प्रेस करावे. तळमजल्याला अलार्म असतो तो लाईट बंद असेल तरीही वाजतो. लिफ्टमध्ये जो आरसा असतो. तो केवळ लिफ्टद्वारे प्रवास करणारांच्या विरंगुळ्यासाठी असतो. मॅकेन्झी २०१०चा रिपोर्ट असं सांगतो की, भारतामध्ये पुढील २० वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात शहरीकरण होणार आहे. कामासाठी असलेल्या विविध संधी, शैक्षणिक सुविधा, कला, क्रीडा आणि इतर सांस्कृतिक संधी या सर्वांमुळे भारताच्या ग्रामीण भागांतून अधिकाधिक लोकसंख्या शहरांकडे आकर्षित होत आहे. या लोकसंख्येला पुरे पडण्यासाठी शहरी प्रशासनाला प्रचंड प्रमाणात वीज, पाणी, रस्ते, उद्वाहने, मलनि:सारण, कचरा व्यवस्थापन या सर्वांसाठी अधिकाधिक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासकीय यंत्रणेबरोबरच त्याला शहरातील उद्योग व्यावसायिकांनी मदतीचा हात दिल्यास ही प्रगती अधिक झपाट्याने होईल. एवढ्या मोठ्या प्रमाणात टॉवर्सची उभारणी झाल्यावर तेथील रहिवाशांना वर-खाली वाहतुकीसाठी जे उपकरण वापरण्यात येते त्यास लिफ्ट अथवा उद्वाहन म्हणतात. आजकाल सर्व हाऊसिंग सोसायटीज, कॉर्पोरेट ऑफिसेस, औद्योगिक क्षेत्र, शॉपिंग मॉल्स इत्यादींमध्ये लिफ्टस्चा सर्रास वापर होत आहे. त्यामुळे त्याबाबतचे नियम आणि लिफ्टस्चा सुरक्षितपणे वापर या संदर्भात सर्वसामान्य लोकांना माहिती मिळणे आवश्यक झाले आहे. विद्युत नियमावली ही संपूर्ण हिंदुस्थानात एक आहे. वीज कायदासुद्धा सर्व राज्यांमध्ये एकच आहे, तसे लिफ्टच्या बाबतीत मात्र नाही. लिफ्टचा वेग 1 सेकंद पर मिटर एव्हढा असतो. लिफ्ट अर्थात उद्वाहनाच्या मेंटेनन्सच्या अभावामुळे रोप तुटून अपघात होऊ शकतात. त्यामुळे लिफ्टचा मेंटेनन्स वेळोवेळी करणे आवश्यक असते, असेही प्रकाश पाटील यांनी यावेळी सांगितले.

### मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे आयोजन....

या कार्यक्रमाला यावेळी सोसायटीमधील रहिवाशांसह एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष धनंजय वाणी, उपाध्यक्ष दीपक पाटील, खजिनदार पंढरीनाथ हिंगे, मार्गदर्शक सतिश कदम, प्रसन्न शिरोडकर, सचिन कासार, प्रकाश कांबळे, कार्यक्रमाचे प्रयोजक विशाल गोडसे, युवराज कदम, सल्लागार सचिन शिंदे, अमोल दिसले, सचिव दिनेश सकट, सहसचिव सत्यवान वाळुंज, कार्यवाहक गणेश क्षिरसागर, सचिन कुंभार, सुनील पवार, कृष्णा लोखंडे, चंद्रशेखर शर्मा, सुमीत पुरी, सागर माळकर, नीलेश परदेशी, बाळासाहेब लभडे, सोहेल शेख, रविंद्र उतेकर, पुंजाजी ससाणे, शरद सातपुते, रविंद्र जाधव, राजेश सोळंकी, पियुष पाटील, अजित गोळराखे, माध्यम प्रतिनिधी सार्थक कुंभार, ओम हिंगे, सुधांशु अनेच्छा, आदित्य कदम यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली.

# जनसंवाद सभेत तक्रारींचाच सूर!

## गणेश विसर्जनासाठी महापालिकेने अधिक मनुष्यबळासह सुविधा पुरवाव्यात; नागरिकांची 'जनसंवाद मागणी

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेने यंत्रणेसह सुविधा उपलब्ध करून दिल्याने पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाकडे नागरिकांचा अधिक कल दिसून येत आहे. गणेश विसर्जनाच्या पुढील दिवसांसाठी देखील महापालिकेने अधिक मनुष्यबळासह सुविधा पुरवाव्यात अशी मागणी जनसंवाद सभेत नागरिकांनी केली. सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी गणेश विसर्जन स्थळी वैयक्तिक लक्ष देऊन कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी प्रत्येक सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज जनसंवाद सभा पार पडली. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत 71 नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे 16, 9, 5, 5, 4, 8, 18 आणि 6 नागरिकांनी उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले.

अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह, या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता सतीश इंगळे, समाज विकास विभागाचे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, आरोग्य विभागाचे उप आयुक्त अजय चारठाणकर, भूमी (PCMC JANSAWAD SABHA) आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत जोशी, यांनी भूषवले. तसेच क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अण्णा बोदडे, उमाकांत गायकवाड, राजेश आगळे, सीताराम बहुरे, विनोद जळक, विजयकुमार थोरात हे उपस्थित होते. आठही क्षेत्रीय कार्यालयातील जनसंवाद सभेत स्थापत्य, जलनिस्सारण, पाणीपुरवठा, विद्युत, नगररचना विभागांचे कार्यकारी अभियंता, उद्यान, वैद्यकीय, आरोग्य, करसंकलन या विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### नागरिकांच्या तक्रारींचा ओघ सुरुच!

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या, जुन्या ड्रेनेज वाहिन्या अरुंद असल्याने मलवहनास अडथळा निर्माण होऊन पाणी रस्त्यावर येत आहे, त्यामुळे दुर्गंध पसरून आरोग्यास धोका निर्माण होत आहे, त्यासाठी नव्याने मोठ्या ड्रेनेज वाहिन्या टाकाव्यात,(PCMC JANSAWAD SABHA) अनेक ठिकाणी ड्रेनेज वाहिन्या सतत तुंबत आहेत त्या दुरुस्त कराव्यात, नागरिकांनी रस्त्यावर आणि इतरत्र गाड्या उभ्या केल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत असून संबंधित ठिकाणी नो पार्किंग क्षेत्र दर्शवणारे फलक लावावेत, घंटागाड्यांमधून कचरा वाहताना कचरा रस्त्यावर पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

रस्त्याच्या कडेला असलेल्या धोकादायक वृक्षांची छाटणी करण्यात यावी, रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत, रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करण्यात यावा,(PCMC JANSAWAD SABHA) उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी, पदपथ आणि रस्त्यावरील अतिक्रमणामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने असे अतिक्रमण काढण्यात यावे, नव्याने पदपथ तयार करण्यात यावे, अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात यावी, रस्त्यांच्या बाजूने पथदिवे लावावेत, अशा सूचना वजा तक्रारी आज झालेल्या जनसंवाद सभेमध्ये नागरिकांनी मांडल्या.

---

# आनंदवार्ता!
# रुग्णसंख्येत मोठी घट!

## शहरात आज 12 नवीन रुग्णांची नोंद, 19 जणांना डिस्चार्ज

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



कोरोनामुळे महापालिका हद्दीतील एकाही रुग्णाचा आज मृत्यू झाला नाही. आजपर्यंत शहरातील 4 हजार 628 जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. शहरातील 3 लाख 70 हजार 323 जणांना आजपर्यंत कोरोनाची लागण झाली. सध्या 460 सक्रिय रुग्ण शहरात आहेत. त्यातील 454 रुग्ण गृहविलगीकरणात उपचार घेत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील कोरोनाच्या रुग्णसंख्येत घट होत आहे. शहराच्या विविध भागातील केवळ 12 नवीन कोरोना बाधित रुग्णांची आज (सोमवारी) नोंद झाली. तर, कोरोनामुक्त झालेल्या 19 जणांना डिस्चार्ज देण्यात आला.

कोरोनामुळे महापालिका हद्दीतील एकाही रुग्णाचा आज मृत्यू झाला नाही. आजपर्यंत शहरातील 4 हजार 628 जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. शहरातील 3 लाख 70 हजार 323 जणांना आजपर्यंत कोरोनाची लागण झाली. सध्या 460 सक्रिय रुग्ण शहरात आहेत. त्यातील 454 रुग्ण गृहविलगीकरणात उपचार घेत आहेत.

तर, केवळ 6 रुग्ण महापालिका रुग्णालयामध्ये दाखल आहे. (PIMPRI CORONA UPDATE) आज दिवसभरात 67 नागरिकांचे लसीकरण झाले. आजपर्यंत 37 लाख 54 हजार 546 जणांनी कोरोना प्रतिबंधक लस घेतली.

# वाहनचालकांनो, पर्यायी मार्गाचा वापर करा !



। पिंपरी । महाईन्यूज ।

गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगाने तळेगाव दाभाडे आणि चाकण येथील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. मंगळवारी (दि. ६) दुपारी दोन ते बुधवारी (दि. ७) पहाटे दोन या कालावधीत वाहतूक वळविण्यात आली आहे. तळेगाव आणि चाकण वाहतूक विभागांतर्गत हा बदल केला आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त आनंद भोईटे यांनी केले आहे. तळेगाव ते चाकरण रस्त्यावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना प्रवेश बंदी केली आहे. त्यामुळे या वाहनांनी तळेगाव एमआयडीसी फाटा- नवलाख उंब्रे - शिंदे वासुली आंबेठाण चौक मार्गे इच्छितस्थळी जावे. चाकण ते तळेगाव रस्त्यावर सर्व प्रकारच्या जड व अवजड वाहनांना प्रवेश बंदी आहे. या वाहनांनी चाकण - आंबेठाण चौक - शिंदे वासुली - नवलाख उंब्रे, तळेगाव एमआयडीसी फाटा मार्गे इच्छितस्थळी जावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

## संपादकीय »

# तो अंधार छेदतोय....!

***आपले जगणे हे कार्यकर्त्यांसाठी आदर्श निर्माण करणारे फारच कमी लोक राजकारणात आहे. सत्तेसाठी राजकारण करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. पण, आपल्यावर ज्यांनी विश्वास टाकून विधिमंडळात पाठविले आहे; त्या जनतेसाठी राजकारण करणाऱ्यांमध्ये सर्वात अग्रक्रमाने नाव घ्यावे असे एकमेव व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. जितेंद्र सतीश आव्हाड साहेब!!***

रस्त्यावर ज्याची कारकिर्द घडते, असा माणूस कधीच रस्त्याला घाबरत नाही. अडथळ्यांची पर्वा त्याला कधीच नसते. डॉ. जितेंद्र आव्हाड नावाचा एक अवलिया असाच आहे. घरात अठराविश्व दारिद्र्य असलेल्या अन् सिन्नरमधून पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत आलेल्या एका हमालाचा नातू ते लाखोंचा पोशिंदा, हा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. प्रचंड मेहनत, निष्ठा आणि जनतेप्रती असलेला प्रामाणिकपणा या जोरावर डॉ. आव्हाड यांनी हा प्रवास केला आहे. त्यांचा हा प्रवास नक्कीच अनेकांना प्रेरणादायी तर आहेच; पण, त्यांच्यातील प्रकाशमान कर्तृत्वाचा प्रत्यय आणून देणाराही आहे. असं म्हटलं जातं की, शिक्षण हे जेवायला नव्हे तर जगायला आणि जगवायला शिकतं!

डॉ. आव्हाड यांच्या मातापित्याला हे गमक समजले होते. म्हणूनच डॉ. आव्हाड हे उच्चशिक्षित झाले अन् त्यातूनच या ठाण्याला, या राज्याला अन् देशाला आभाळ छेदणारे अन् अंधाराच्या आरपार पाहणारे नेतृत्व लाभले. सामाजिक क्षेत्रात काम करणारा नेता सत्तेच्या राजकारणात किती संवेदनशीलतेने काम करू शकतो, हे डॉ. आव्हाडांनी सन 2009 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजयी झाल्यानंतर लागलीच दाखवून दिले होते. आपण ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो, त्या भागाचा विकास केला तरच आपणाला लोकप्रतिनिधी म्हणवून घेण्याचा अधिकार आहे, अशी धारणा बाळगल्यामुळेच कधीकाळी ठाणे शहरावरुन ओवाळून टाकलेल्या कळवा-मुंब्रा भागाचा विकास त्यांनी केला आहे. डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्याकडे पाहिल्यानंतर साधारणपणे सर्वच जण त्यांना "रांगडा गडी, आक्रस्ताळी माणूस" असेच म्हणत असतील. पण, या रांगड्या मनाच्या आत एक संवेदनशील राजकारणी दडलेला असल्याचे कळवा-मुंब्रावासिय आजही मोठ्या मनाने कबूल करीत आहेत. ज्या कळवा- मुंब्र्याला स्वत:ची ओळखच नव्हती. त्या कळवा- मुंब्र्यात आज जो विकास दिसत आहे. त्यामागे डॉ. आव्हाड यांचा 'आक्रस्ताळी' स्वभावच महत्वाचा ठरला आहे. आपल्या भागाचा विकास करण्यासाठी त्यांनी आक्रस्ताळी भूमिका घेऊन पुकारलेला 'संघर्ष'च या विकासकामांसाठी मैलाचा दगड ठरलेला आहे. आज कितीजणांना आठवत असेल हे माहित नाही. पण, ज्यावेळी हरीत वसई या संघटनेच्या याचिकेवरुन कळव्यातील हजारो लोकांचा निवारा जमीनदोस्त करण्याचे आदेश कोर्टाने दिले.



## आनंदी सकाळ

### या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात होते प्रगती...

आपला देह हा पंचभूतात्मक आहे, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही तत्त्वरूपाने असतात. वाहणारा वायू हा जडस्वरूप वायू आहे; मात्र तत्त्वरूपातील वायू किंवा पाणी हे यापेक्षा वेगळे आहे. मन हे वायू तत्त्वापासून, बुद्धी हे तेज, चित्त आकाश, तर अहंकार हा पृथ्वी तत्त्वापासून म्हणजे जडतत्त्वापासून बनला आहे. यातील मन चंचल आहे. ते भटकते. हा त्याचा दोष; पण जेथे दोष असतात, तेथे काही गुणही असतात. जसे चिकटणे हा हिंगाचा दोष असला, तरी तो योग्य पद्धतीने सेवन केल्यास तो जठररोग दुरुस्त करतो; तसेच चंचलता हा मनाचा दोष असला, तरी परमार्थाच्या दृष्टीने तोही उपयुक्त आहे. मन स्थिर असते, तर जीवनात घडलेली एखादी दु:खद घटना आपण मरेपर्यंत विसरलो नसतो. मन चंचल असल्यामुळे आपण जुने विसरून नव्या उभारीने जीवन सुरू करतो. ही नवी उभारी या चंचल मनामुळे येते, म्हणून चंचलता हा दोष व गुण असे दोन्ही आहे. या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात प्रगती होते.

# वन-जन-मन : नक्षलींशी लोकशाही मार्गाने संघर्ष






'वनाधिकार व पेसा हे दोन्ही कायदे जंगलात राहणाऱ्या आदिवासी व इतरांवर झालेला ऐतिहासिक अन्याय दूर करणारे आहेत. जंगलात राहून याच अन्यायाविरुद्ध लढण्याची भाषा आजवर नक्षली करत आले. त्यामुळे भविष्यात ते या कायद्याचे समर्थन करत लोकशाही प्रक्रियेत सामील होत असतील तर आनंदच आहे' तत्कालीन पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी हे उद्गार काढले गडचिरोलीतील लेखामेंढय़ाला. २०११ मध्ये या गावात झालेल्या वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणी शुभारंभ कार्यक्रमातील हा प्रसंग. हा कायदा लागू करताना ऐतिहासिक चुकीची उघड व उदारपणे कबुली देणाऱ्या सरकारच्या मनात किमान यानिमित्ताने तरी नक्षलींना लगाम बसेल हा हेतू होताच. त्यामुळे देशभरात या कायद्याचे स्वागत करताना 'बंदूक का जबाब बांबू से देंगे' अशा घोषणा अनेक ठिकाणी दिल्या गेल्या. या कायद्यामुळे जंगलाचे अधिकार आदिवासींच्या हाती जातील. त्याचा फायदा घेत नक्षली आणखी गैरप्रकार करतील अशी भीतीही तेव्हा व्यक्त केली गेली. जे काही घडेल ते समोर बघू, नक्षली नेमके काय करतात तेही बघू अशीच भूमिका तेव्हा रमेश यांनी घेतली. नंतरच्या १५ वर्षांत नेमके काय झाले?

या मुद्यावर नक्षली नेमके कसे वागले याचा आढावा घेण्याआधी थोडे इतिहासात डोकावणे इष्ट ठरेल. नक्षलींचा उगम झाला तोच मुळात जमीनदारांच्या विरोधात भूमिपुत्रांच्या बाजूने दिलेल्या लढय़ातून. नक्षलबारी, श्रीकाकुलम, विशाखापट्टणमचे उठाव याच मुद्दय़ावरचे. भूसुधार कायदे हवेत अशीच तेव्हाची मागणी. नंतर थंडावलेल्या या चळवळीने पुन्हा उभारी घेतली तेव्हा नक्षलींचे मुद्दे बदलले. मध्यभारतातले जंगल हे प्रभावक्षेत्र ठेवायचे असेल तर या भागात राहणाऱ्या आदिवासींच्या प्रश्नाला हात घालायला हवा असे लक्षात येताच जल, जमीन, जंगलचा नारा नक्षलींनी दिला. कायम अन्यायग्रस्त असलेल्या आदिवासींना तातडीने दिलासा देत चळवळीच्या बाजूने वळवायचे असेल तर तेंदूपाने व बांबू तोडणीत होणाऱ्या त्यांच्या आर्थिक पिळवणुकीकडे लक्ष द्यायला हवे हे नक्षलींनी बरोबर हेरले. ही ऐंशीच्या दशकातील घडामोड.

# पाचवा वर्ण अस्पृश्यतेचा...

**'नकोसे झालेले लोक' हे संपादकीय (१९ ऑगस्ट) वाचल्यावर स्वत:ला माणूस म्हणून घेण्याची लाज वाटली. आपल्याकडे चार वर्णामधला शेवटचा वर्ण 'शूद्र' म्हणून ओळखला जातो.**

वर्णव्यवस्थेच्या भेदभावाला आज कायद्याची मान्यता नसली तरी तथाकथित उच्चवर्णीय भारतीयांच्यात तो इतका भिनला आहे की त्या विकृतीचे दर्शन आपल्याला वारंवार अगदी हिंसक पद्धतीनेसुद्धा पाहायला मिळते. शिक्षकांच्या मडक्यातले पाणी प्यायला म्हणून एका दलित विद्यार्थ्यांला शिक्षकाने मारण्याची घटना ताजी आहे.

पण या कथित शूद्रांच्यात आणखी एका वर्णाचा समावेश आपल्याला करावा लागेल. तो म्हणजे इस्लामी जनता. मुस्लिमांबद्दलचा हा वर्णभेद जागतिक आहे. अमेरिका, चीन, इस्रायल, भारत तसेच अनेक युरोपीय देश अशा अनेक देशांत या रोगाचा आढळ होताना दिसतो. जणू काही प्रत्येक मुस्लीम जन्मत:च गुन्हेगार असतो अशा तऱ्हेच्या कल्पना जनसामान्यांत इतक्या खोलवर रुजल्या आहेत की प्रत्येक मुस्लिमाकडे आपण संशयाने पाहायला हवे; त्यांना नोकऱ्या, शेजारच्या घरात राहायला जागा अशा साऱ्या सुविधा देणे टाळावे; आपल्या मुलाने किंवा (विशेषत:) मुलीने मुस्लीम व्यक्तीबरोबर लग्न करायचे ठरवले तर साऱ्या कुळाला बट्टा लागला; त्यासाठी मुलाला घराबाहेर काढले पाहिजे; किंवा ऑनर किलिंग केले पाहिजे अशा कल्पना इथे ठाम रुजल्या आहेत. एरवी सभ्य आणि सुसंस्कृत भासणारी माणसे मुस्लिमांबद्दल बोलू लागतात तेव्हा त्यांच्यात जणू काही सैतान संचारला आहे की काय असे वाटायला लागते. ऐकीव माहिती आणि काही सुटी उदाहरणे यांच्या साहाय्याने माणसे सरळसरळ सुतावरून स्वर्ग गाठतात. हे सगळे पाहून मन विषण्ण होते आणि आता तर भाजपच्या जोडीने आम आदमी पक्षानेदेखील या मुस्लिमद्वेषाच्या धगधगत्या कुंडात उडी घेतली आहे. रोहिंग्यांना दिल्लीत घरे देऊ नयेत, त्यामुळे दिल्लीकरांना धोका आहे; वाटल्यास भाजपने आपले शासन असलेल्या राज्यात रोहिंग्यांना राहायला जागा द्यावी असे वक्तव्य आप पक्षाचे आमदार सौरभ भारद्वाज यांनी केले आहे. (अर्थात दिल्लीतसुद्धा रोहिंग्यांना वसवले जाणार नाही असे गृहखात्याने स्पष्ट केल्याने सगळा वाद संपला आहे. भाजप आपल्या द्वेषाच्या संस्कृतीला पूर्णपणे जागला आहे.) 'मनमानी कारभाराबद्दल न्यायालयाने आयकर खात्यालाच दंड लावला' ही बातमी वाचली. भोंगळ आणि मनमानी कारभाराबद्दल आयकर आणि जीएसटी खाते यांच्यात जणू तीव्र स्पर्धा सुरू आहे. एका करदात्यांच्या प्रकरणामध्ये त्यांच्या भाडय़ाने दिलेल्या जागेचे भाडे त्यांच्या राहत्या घरासाठीदेखील मिळाले आहे असे दाखवून मोठी डिमांड काढली गेली. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये भागीदारी संस्थेला वैयक्तिक करदाता समजून त्यातून उद्भवणाऱ्या तथाकथित कारणांमुळे त्यांचे रिटर्न सदोष असल्याचे कळवले गेले. असे असंख्य प्रकार सीए आणि करसल्लागारांना रोज अनुभवास येत आहेत. सध्याचा कहर म्हणजे करदात्याच्या टॅक्स रिटर्नमध्ये रिफंड निघाला असेल तर, त्याला कधीच कळवल्या न गेलेल्या अनेक वर्षांच्या चुकीच्या थकबाक्या त्याच्या नावासमोर अचानक जन्मास येत आहेत. एका जेष्ठ नागरिक महिलेने वर्ष २०२१-२२ साठी रिफंड मागितला असता त्यांना चक्क २००५-०६ सालाची, कुठलाही आगापिछा न सांगितलेली, एक थकबाकी तुमच्या या रिफंडसमोर वळती करत आहोत असा मेल आला. आयकर खात्याच्या बव्हंशी

## ।। अभंगवाणी ।।




पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### गिरणी कामगारांच्या पदरी प्रतीक्षाच



। मुंबई । महाईन्यूज ।

कोन, पनवेलमधील घरांसाठीच्या ८०० हून अधिक पात्र गिरणी कामगारांच्या गृहकर्जाचा हप्ता सुरू झाला आहे. उर्वरित पात्र कामगारांकडून घरांची संपूर्ण रक्कम भरून घेण्यात येत आहे. मात्र या पात्र कामगारांना घरांचा ताबा देण्यात आलेला नाही. आता म्हाडाच्या मुंबई मंडळाने या घरांचा ताबा सहा महिन्यानंतर मिळेल असे कामगारांना लेखी कळविले आहे. त्यामुळे कामगारांची घरासाठीची प्रतीक्षा वाढली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) भाडेतत्त्वावरील गृहयोजनेतील गिरणी कामगारांसाठीच्या २,४१८ घरांसाठी २०१६ मध्ये सोडत काढण्यात आली होती.

# "अभी नही तो कभी नही, अशा आवेशात लढा"

## मुंबई महापालिकेसाठी देवेंद्र फडणवीसांनी रणशिंग फुंकले



। मुंबई । महाईन्यूज ।

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी रणशिंग फुंकलं आहे. 'अभी नही तो कभी नही, अशा आवेशात लढा. आता एकच लक्ष मुंबई महानगरपालिका,' असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. लालबाग गणपतीच्या दर्शनासाठी मुंबई दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मेघदूत या शासकीय निवासस्थानी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. तेव्हा देवेंद्र फडणवीस बोलत होते.

"महापालिकेवर भाजपाचाच झेंडा फडकणार आहे. मुंबईत ओरिजनल शिवसेना आमच्यासोबत आली आहे. गणेशोत्सवात सगळ्या ठिकाणी भाजपाचाच बोलबाला आहे. शिवसेना राजकारण करत असेल तर, आपण त्यांना मागे टाकू. आपल्या जीवनातील ही शेवटची निवडणूक आहे, असं माना. अभी नही तो कभी नही, आता केवळ एकच लक्ष मुंबई महानगरपालिका आहे," असा कानमंत्र देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना दिला आहे.

### "शिवसेनेवर जनतेचा रोष"

"आपल्या 'मिशन मुंबई'साठी सर्वांचचं योगदान महत्वाचं आहे. सर्वांनी जोरदार तयारी करायची आहे. वॉर्ड रचना, प्रभाग रचना याचा विचार करुन चालणार नाही, पदाधिकाऱ्यांनी काम करत रहावे. पालिकेतील सत्ताधारी शिवसेनेवर जनेतचा रोष आहे," असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं आहे.

### "उद्धव ठाकरेंना जमीन दाखवण्याची वेळ"

पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना अमित शाह यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. "उद्धव ठाकरेंनी आपल्याला धोका दिला आहे. केवळ दोन जागांसाठी त्यांनी २०१४ मध्ये युती मोडली असं सांगतानाच मोदी आणि फडणवीसांच्या नावाने मतं मागून जिंकून आल्यानंतर आमच्याशी विश्वासघात केल्याचा आरोप शाह यांनी केला. उद्धव ठाकरेंना आता जमीन दाखवण्याची वेळ आली आहे," असं म्हणत अमित शाह यांनी देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उधळला.

# "सत्तांतरासाठी आमदारांना भाजीपाल्याप्रमाणे विकत घेतलं

## "काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महाराष्ट्रातील सत्तांतराबाबत मोठं विधान

। मुंबई । महाईन्यूज ।

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापलं आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळलं आहे. भारतीय जनता पार्टीनं बंडखोर आमदारांना प्रत्येकी ५० कोटी रुपये देऊन विकत घेतल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांनी केला आहे. पावसाळी अधिवेशनादरम्यान तर '५० खोके, एकदम ओके' अशा घोषणाही विरोधकांनी दिल्या होत्या



### नाना पटोलेंनी बोचरी टीका केली

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मोठं विधान केलं आहे. महाराष्ट्रातील आमदारांना भाजीपाल्याप्रमाणे खरेदी केलं, हे चित्र महाराष्ट्रासाठी शरमेनं मान खाली घालायला लावणारं आहे, असं नाना पटोलेंनी म्हटलं आहे. यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरातही उपस्थित होते. बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले यांनी संबंधित मुलाखतीतून महाराष्ट्रातील विविध राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर आपली मतं व्यक्त केली आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार कोसळण्यासाठी कारणीभूत असलेल्या बंडखोर आमदारांच्या चारित्र्याबाबत विचारलं असता, नाना पटोलेंनी बोचरी टीका केली आहे.

या सर्व घडामोडीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मोठं विधान केलं आहे. महाराष्ट्रातील आमदारांना भाजीपाल्याप्रमाणे खरेदी केलं, हे चित्र महाराष्ट्रासाठी शरमेनं मान खाली घालायला लावणारं आहे, असं नाना पटोलेंनी म्हटलं आहे. यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरातही उपस्थित होते. बाळासाहेब थोरात आणि नाना पटोले यांनी संबंधित मुलाखतीतून महाराष्ट्रातील विविध राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर आपली मतं व्यक्त केली आहेत. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार कोसळण्यासाठी कारणीभूत असलेल्या बंडखोर आमदारांच्या चारित्र्याबाबत विचारलं असता, नाना पटोलेंनी बोचरी टीका केली आहे.

महाराष्ट्रातील आमदारांच्या चारित्र्यावर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले की, "महाराष्ट्राच्या लोकप्रतिनिधिंचं गुवाहाटीत ज्याप्रकारे दर्शन घडलं, हे खऱ्या अर्थानं महाराष्ट्राची मान शरमेनं खाली घालायला लावणारं आहे. महाराष्ट्रात दबावतंत्राचा अवलंब करत लोकप्रतिनिधिंना भाजीपाल्यासारखं विकत घेण्याचं काम झालं. या प्रकाराला कुणीही माफ करणार नाही. या गोष्टीची जेवढी निंदा करू, जेवढा विरोध करू, तेवढं कमी आहे.

# मुंबईत विसर्जन शांततेत

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबईत रविवारी पाच दिवसांच्या गणपतींचे विसर्जन झाले. मात्र यावेळी मुंबईतील आवाजाची पातळी कमी नोंदवली गेली. गिरगाव चौपाटी आणि वांद्रे परिसर वगळता उर्वरित मुंबईत विसर्जन शांततेत पार पडले.दोन वर्षांनंतर निर्बंधमुक्त वातावरणात गणेशोत्सव साजरा होत आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या प्रमाणावर कच्छी बाजा, बेन्जो, ढोल-ताशा आदींचा गजर होण्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र प्रत्यक्षात पाच दिवसांच्या गणेश विसर्जनादरम्यान मुंबईत कुठेही ध्वनी प्रदूषण वाढल्याचे आढळले नाही.

'आवाज फाउंडेशन'च्या अहवालानुसार मुंबईत सर्वाधिक ११५.६ डेसिबलपर्यंत आवाजाच्या पातळीची नोंद झाली आहे. गिरगाव चौपाटीजवळील बाबुलनाथ चौकाजवळ आवाजाच्या पातळीची ही स्थिती होती. वांद्रे येथील लकी जंक्शन परिसरात ११२.२ डेसिबल इतक्या आवाजाच्या पातळीची नोंद झाली.



या परिसरात ढोल-ताशांमुळे काहीसा आवाज वाढला होता. मात्र मागील काही वर्षांच्या तुलनेत आवाज कमीच असल्याचे 'आवाज फाउंडेशन'च्या सुमेरा अब्दुलाली यांनी सांगितले. वांद्रे, गिरगाव चौपाटीपाठोपाठ लिंकिंग रोड येथे १०९.४ डेसिबल आवाजाच्या पातळीची नोंद झाली. गणेश विसर्जनानिमित्त गिरगाव चौपाटी आणि शिवाजी पार्क येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. मात्र या ठिकाणी आवाज कमी असल्याचे निदर्शनास आले. शिवाजी पार्क येथील आवाजाची पातळी ८२.५ डेसिबल अशी होती तर गिरगाव चौपाटीवर ८२.० डेसिबल इतका आवाज होता. सर्वात कमी ७३.१ डेसिबल इतकी आवाजाची पातळी जुहू चौपाटी येथे नोंदविण्यात आली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पाटनामध्ये ५५ प्रवाशांना घेऊन जाणारी बोट पलटली

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

बिहारची राजधानी पटनाजवळील मणेर गावात बोटीला अपघात झाला आहे. ५० ते ५५ प्रवाशांना घेऊन जाणारी एक बोट शेरपूर घाटाजवळ गंगा नदीत बुडाल्याची घटना घडली आहे. या अपघातातील ४५ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं आहे. तर १० प्रवासी अजूनही बेपत्ता आहे. एनडीआरएफकडून या बेपत्ता प्रवाशांचा शोध सुरू आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, गंगा नदीच्या एका काठावरुन तीन बोटींमधून काही लोक चारा कापून आपापल्या घरी परतत होते. दरम्यान, नदीच्या जोरदार प्रवाहामुळे दोन बोटींची धडक झाली. बोटीवरील बहुतांश लोक दानापूर शाहपूर भागातील रहिवासी असल्याचं सांगितलं जात आहे. घटनेची माहिती मिळताच आजूबाजूला मोठी गर्दी झाली. त्यानंतर शहापूर संबंधित घटनेची यंत्रणांना माहिती देण्यात आली असून तात्काळ बचावकार्य सुरु करण्यात आलं.

# खासगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आपल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरवणं हे संबंधित खासगी रुग्णालयाचं कर्तव्य आहे. देशातील प्रत्येक खासगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सरकार सुरक्षा पुरवू शकत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. खासगी रुग्णालय हा व्यवसाय आहे, त्यामुळे त्यांना त्यांच्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा करणं गरजेचं आहे.

रुग्णालय आणि चिकित्सा केंद्रातील अधिकाऱ्यांना सुरक्षा पुरवण्यासाठी राज्य सरकारला आदेश द्या, अशी याचिका दिल्ली मेडिकल असोसिएशन आणि डॉ.सत्यजित बोरा यांच्याकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. रुग्णांच्या नातेवाईकांकडून डॉक्टरांना मारहाण केली जाते. असे प्रकार रोखण्यासाठी राज्य किंवा केंद्र सरकारने खासगी रुग्णालयांना सुरक्षा पुरवावी अशी मागणी याचिकेमार्फत करण्यात आली होती.

न्यायमूर्ती एसके कौल आणि न्यायमूर्ती एएस ओका यांच्या खंडपीठाने



**खासगी रुग्णालयांनी आपल्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा व्यवस्था स्वतःच करावी. केवळ सरकारी रुग्णालयातच सरकारकडून सुरक्षा पुरवली जाईल. देशात मोठ्या संख्येने खासगी रुग्णालय, नर्सिंग होम आणि चिकित्सा केंद्रे आहेत. या सर्वांना सुरक्षा पुरवणं हे सरकारचं काम आहे का असा सवाल न्यायमूर्तींनी वकिलांना केला. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, खासगी रुग्णालयांनी स्वतःची सुरक्षाव्यवस्था स्वतः निर्माण करावी. खासगी रुग्णालय सुरक्षेसाठी सरकारवर दबाव आणू शकत नाहीत.**

निर्णय दिला की, खासगी रुग्णालयांनी आपल्या कर्मचाऱ्यांची सुरक्षा व्यवस्था स्वतःच करावी. केवळ सरकारी रुग्णालयातच सरकारकडून सुरक्षा पुरवली जाईल. देशात मोठ्या संख्येने खासगी रुग्णालय, नर्सिंग होम आणि चिकित्सा केंद्रे आहेत. या सर्वांना सुरक्षा पुरवणं हे सरकारचं काम आहे का असा सवाल न्यायमूर्तींनी वकिलांना केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, खासगी रुग्णालयांनी स्वतःची सुरक्षाव्यवस्था स्वतः निर्माण करावी. खासगी रुग्णालय सुरक्षेसाठी सरकारवर दबाव आणू शकत नाहीत.

# वाढत्या महागाईचा परिणाम! तीनपैकी एका कुटुंबाने दूध खरेदी करणं सोडलं

। ।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गेल्या काही दिवसांपासून दूधाचे दर सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे लोकांनी दूध पिणं सोडून दिलंय. देशात प्रत्येक तीन कुटुंबापैकी एका कुटुबांने दूध विकत घेणं सोडून दिलं असल्याचं एका सर्वेक्षणातून सिद्ध झालं आहे. ऑगस्ट महिन्यात अमूल, मदर डेअरी, महानंद, गोकूळसारख्या दूध उत्पादकांनी प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ केली आहे. एकीकडे सर्वच वस्तूंच्या किंमती महाग होत असताना, भाजीपाला महागलेला असताना दूध आणि दुग्धजन्य पदार्थही महागल्याने सामान्य जनतेचा महिना अखेरिस खिसा रिकामा होत आहे.

लोकल सर्कल नावाच्या एका संस्थेने ३११ जिल्ह्यांतील २१ हजार लोकांचे सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार, पूर्वी जेवढं दूध विकत घेतलं जायचं तेवढंच आजही विकत घेत असल्याचं ६८ टक्के लोकांनी सांगितलं. तर, ६ टक्के लोकांनी सांगितलं की दूधाच्या किंमती वाढल्याने ते स्वस्त ब्रॅण्डचे दूध विकत घेतात. ४ टक्के लोक म्हणाले की, ते नेहमीच्याच ब्रॅण्डचे दूध घेतात, मात्र, कमी किंमतीतील दूध घेतात.



सर्व्हेत सहभाग घेतलेल्या २० टक्के लोकांनी दूध विकत घेण्याच प्रमाण कमी केलं असल्याचं सांगितलं. १० हजार ५२२ लोकांपैकी ७२ टक्के लोकांनी सांगितलं की ते अर्धा लिटर किंवा एक लिटर दूधाचं पाऊच खरेदी करतात. तर, १२ टक्के लोक स्थानिक ब्रॅण्डचे, बॉटलमध्ये उपलब्ध होणार दूध खरेदी करतात. तर, १४ टक्के लोक सुट्टे दूध खरेदी करतात. तर फक्त २ टक्के लोक टेट्रा पॅकवाले दूध खरेदी करत असल्याचंही या सर्वेक्षणातून सिद्ध झालं आहे.दूधाच्या किंमती वाढल्यानंतरही ६८ टक्के कुटुंब तेच दूध खरेदी करतात जे आधी करायचे. मात्र, ३२ टक्के लोकांनी दूध विकत घेणं कमी केलं आहे. किंवा कमी किंमतीतले दूध विकत घेतले जातात. दरम्यान, येत्या काळात दूध आणखी महागाण्याची शक्यता आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात भाजीपालासह दूधही सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर जाण्याची शक्यता आहे.

# कोण आदित्य ठाकरे?, 32 वर्षांचा पोरगा आमच्यावर टीका करतोय

## गुलाबराव पाटलांचा हल्लाबोल

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आदित्य ठाकरेंवर आमचा मुळीच बोलण्याचा अधिकार नाही. कारण आम्हाला बाळासाहेबांनी आणि उद्धव ठाकरेंनी मोठं केलं आहे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे कोण आहेत?, तुम्ही गद्दार आहात असं बोलण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे. 32 वर्षांचा पोरगा आमच्यावर टीका करतोय. तेव्हा आदित्य ठाकरे गोधडीत नव्हते तेव्हा मी शिवसेनेत होतो, असा हल्लाबोल शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांनी केला आहे.

शिवसेनेतून बाहेर पडल्यावर



काही लोक म्हणतात की, तेरा क्या होगा कालिया? मात्र आमचा गब्बर आहे, असं म्हणत गुलाबराव पाटील यांनी विरोधकांना उत्तर दिलं. तुम्ही इस्टेटचे वारसदार होऊ शकतात. परंतु विचारांचे वारसदार होऊ शकत नाही. बाळासाहेबांच्या विचारांचा वारसदार हा गुलाबराव पाटील आहे. मी गुवाहाटीला गेलो होतो. तेव्हा पत्नी मुलांचे फोन आले. परत या म्हटले. आता परत येत नाही असे म्हणत ही संघर्षाची कहाणी असल्याचं मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले.

**उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे कोण आहेत?, तुम्ही गद्दार आहात असं बोलण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे. 32 वर्षांचा पोरगा आमच्यावर टीका करतोय. तेव्हा आदित्य ठाकरे गोधडीत नव्हते तेव्हा मी शिवसेनेत होतो, असा हल्लाबोल शिंदे गटाचे आमदार गुलाबराव पाटील यांनी केला आहे. शिवसेनेतून बाहेर पडल्यावर काही लोक म्हणतात की, तेरा क्या होगा कालिया? मात्र आमचा गब्बर आहे, असं म्हणत गुलाबराव पाटील यांनी विरोधकांना उत्तर दिलं.**

# मुंबई महापालिकेचे आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार रखडले!

। ।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने मुंबई महापालिका दरवर्षी पालिका व खासगी शाळांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ५० शिक्षकांची आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारासाठी निवड करून त्यांचा विशेष कार्यक्रमात सन्मान करते. मात्र यंदा पालिकेची निवडणूक मुदत ७ मार्च रोजीच संपली. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया रखडली. पालिकेत सत्ताधारी कोणीच नाहीत. प्रशासनाच्या हातात संपूर्ण निर्णय प्रक्रिया असतानाही



५ सप्टेंबरपर्यंत ना आदर्श शिक्षक निवडले ना त्यांची यादी जाहीर झाली व ना पुरस्कार लाभले. जणू पालिकेलाच शिक्षक दिन व आदर्श शिक्षक निवडीचा विसर पडला की काय,अशी पालिका वर्तुळात चर्चा सुरू आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ' शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्याची पालिकेत परंपरा आहे. त्यानिमित्ताने पालिका शिक्षण विभाग व आर्दश शिक्षक महापौर पुरस्कारासाठी शिक्षण समितीच्या माध्यमातून ५० शिक्षकांची निवड करते. मात्र यंदा ७ मार्च रोजी पालिकेची मुदत संपली. त्यामुळे पालिकेत पुन्हा निवडणूक होऊन सत्ताधारी पक्ष, महापौर, उप महापौर, सभागृह नेते, विविध समिती अध्यक्ष यांची निवड होणे अपेक्षित होते. मात्र राजकीय तिढा, घाणेरडे राजकारण, प्रशासनाची अक्षम्य उदासीनता आदी कारणांमुळे हे सर्व काही वेळेत घडू शकले नाही. परिणामी सोमवारी शिक्षक दिन उजाडला व दिवस मावळला तरी आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारासाठी वर्षभरात उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी करणाऱ्या ५० शिक्षकांची यादी प्रशासनाला तयार करता आली नाही. त्यामुळे शिक्षक वर्गाकडून प्रशासनाच्या उदासीनतेवर टीकेची झोड उठविण्यात येत आहे.

# 'पुष्पा' फेम अभिनेत्री आता अमिताभ बच्चन यांच्यासोबत झळकणार



नागराज मंजुळेचा 'झुंड' चित्रपट काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात पहिल्यांदाच बिग बी अर्थात अमिताभ बच्चन नागराज सोबत काम करत होते. चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही मात्र समीक्षकांनी या चित्रपटाचे कौतुक केले. अमिताभ बच्चन सध्या 'कौन बनेगा करोडपती' कार्यक्रमात व्यस्त आहेत. त्यांनी नुकतेच आपल्या आगामी चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. विकास बहल दिग्दर्शित 'गुडबाय' या चित्रपटात अमिताभ बच्चन दिसणार आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात पुष्पा फेम अभिनेत्री रश्मीका मंदना देखील दिसणार आहे. तिचा हा पहिलाच हिंदी चित्रपट असणार आहे. अमिताभ बच्चन तिच्या वडिलांच्या भूमिकेत आहेत. याआधी निर्मात्यांनी चित्रपटाचा फर्स्ट लुक प्रदर्शित केला होता, ज्यामध्ये ही जोडी दर्शविण्यात आली होती. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये त्यांचे कुटुंब आणि पाळीव प्राणी दिसत आहे. एका सुखी कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणारे हे कुटुंब वाटत आहे. नीना गुप्ता देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. तर त्यांच्या बरोबरीने पावेल गुलाटी, अभिषेक खान, साहिल मेहता आणि पायल थापा यांच्याही चित्रपटात भूमिका आहेत.

# माधुरीचा 'तो' व्हायरल व्हिडिओ पाहून चाहत्यांनी केलं तिला चांगलंच ट्रोल



कित्येक चित्रपट रसिकांची धकधक गर्ल माधुरी दीक्षित ही सध्या चांगलीच चर्चेत असते. फिल्मी करियरमधून मोठा ब्रेक घेतल्यावर माधुरीने पुन्हा चित्रपटसृष्टीत जम बसवला आहे. सध्या ती चित्रपट, वेबसीरिज, टेलिव्हिजन अशा तिन्ही ठिकाणी झळकत आहे. याबरोबरच ती सोशल मीडियावरसुद्धा चांगलीच सक्रिय असते. वेगवेगळ्या लूकमधले तिचे फोटोज ही चांगलेच व्हायरल होत असतात. आत्ताही माधुरीचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. पण या व्हिडिओमध्ये माधुरीच्या सौंदर्याची प्रशंसा करण्यापेक्षा तिच्यावर लोकं टीका करत आहे. या व्हिडिओमध्ये माधुरीचा चेहेरा काहीसा वेगळा दिसत असल्याने लोक तिला थेट 'सर्जरी केली का?' असा प्रश्न कॉमेंटमध्ये विचारत आहे.

# टी- सीरिजकडून 'आशिकी ३'ची घोषणा

टीसिरीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि निर्माते भूषण कुमार यांनी 'आशिकी ३'ची घोषणा केली आहे. राहुल रॉय आणि अनु अग्रवाल यांचा सुपरहिट चित्रपट 'आशिकी' १९९० मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटातील गाणी खूप लोकप्रिय झाली होती. आशिकी चित्रपटाचे दिग्दर्शन महेश भट्ट यांनी केले होते. टी सीरिजने चित्रपटाची निर्मिती केली होती. त्यानंतर २०१३ मध्ये मोहित सुरी दिग्दर्शित 'आशिकी २' प्रेक्षकांच्या भेटीला आला. यामध्ये आदित्य रॉय कपूर आणि श्रद्धा कपूर यांची जोडी होती. हा चित्रपट देखील ब्लॉकबस्टर ठरला. आता या फ्रेन्चायझीमधील तिसरा भाग 'आशिकी ३' येणार असल्याची माहिती समोर येत आहे.




टी- सीरिजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि निर्माते भूषण कुमार यांनी 'आशिकी ३'ची घोषणा केली आहे. 'आम्हाला कळविण्यास आनंद होत आहे की, आम्ही 'आशिकी' फ्रेन्चायझीचा तिसरा भाग आशिकी ३ घेऊन येत आहोत. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग बासू करणार असून कार्तिक आर्यन यामध्ये मुख्य पात्र साकारणार आहे.' यावेळी निर्माते मुकेश भट्ट यांनी १९९० च्या आशिकी चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीचा एक किस्सा सांगितला. 'आशिकीच्या प्रदर्शनाच्या एक दिवसआधी स्व. गुलशनजी (गुलशन कुमार) खूप चिंतेत होते आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी आमच्या चित्रपटाने इतिहास घडवला.' असे मुकेश भट्ट म्हणाले.



अक्षय कुमार आणि प्रियांका चोप्राचे 'ते' गाणे अखेर आज १७ वर्षांनी झाले प्रदर्शित

बॉलिवूडमधील मोठ्या पडद्यावर प्रचंड गाजलेल्या जोड्यांपैकी एक जोडी आहे ती अभिनेता अक्षय कुमार आणि अभिनेत्री प्रियांका चोप्रा यांची. परंतु काही कारणास्तव ही जोडी अल्प काळानंतर तुटली. त्यानंतर ऑनस्क्रीन ते आपल्याला फारसे एकत्र दिसले नाहीत. काही मतभेदांमुळे असे झाले असल्याचे बोलले जाते. पण अक्षय आणि प्रियांका यांनी मिळून प्रेक्षकांना भुरळ घातली. २००५ साली प्रदर्शित झालेल्या सुनील दर्शन दिग्दर्शित 'बरसात' या चित्रपटातून प्रियांकाने आपली छाप प्रेक्षकांवर पाडली. या चित्रपटातील एक गाणे नुकतेच प्रदर्शित झाले आहे. या चित्रपटात अक्षय कुमार प्रमुख भूमिका साकारणार होता पण नंतर त्याच्या जागी बॉबी देओलला कास्ट करण्यात आले. या चित्रपटातील एक व्हिडीओ नुकताच प्रदर्शित झाला असून तो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या चित्रपटा बॉबी देओलची एंट्री होण्याआधी अक्षय आणि प्रियांकावर हे गाणे चित्रित करण्यात आले होते. अखेर आज, चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या १७ वर्षांनतर या चित्रपटातील 'वो पहली बरसात' हे गाणे प्रदर्शित करण्यात आले आहे. या गाण्यात अक्षय कुमार आणि प्रियांका चोप्रा रोमान्स करताना दिसत आहेत. २००५ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटातील या गाण्याने अक्षय आणि प्रियांका यांची जोडी एक उत्कृष्ट ऑनस्क्रीन जोडी होती, याची आठवण प्रेक्षकांना करून दिली आहे. हे पावसावर आधारित गाणे आहे. समीर यांनी या गाण्याचे बोल लिहिले असून या गाण्याला नदीम श्रवण यांनी सांगीतिबद्ध केलं आहे. तर हे गाणे कुमार सानू आणि अल्का याज्ञिक यांनी गायले आहे. या गाण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून अक्षय आणि प्रियांका यांचे चाहते पुन्हा एकदा त्यांना एकत्र स्क्रीन शेअर करताना बघू इच्छितात असे कमेंट्स करत सांगत आहेत.

# अभिनेत्री ऋतुजा बागवेने लालबागच्या राजाला अर्पण केला 'खास' प्रसाद,



अभिनेत्री ऋतुजा बागवेने लालबागच्या राजाला अर्पण केला 'खास' प्रसाद, व्हिडीओ व्हायरल मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीत ऋतुजा बागवे हिचा देखील समावेश होतो. नाटक, मालिका, चित्रपट अशा विविध माध्यमात काम करत ती प्रेक्षकांच्या भेटीस येत असते. अभिनयाबरोबरच ऋतुजा सोशल मीडियावरही खूप सक्रिय आहे. ऋतुजा तिच्या चाहत्यांशी सोशल मीडियाद्वारे संवाद साधत असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या आयुष्यात घडणाऱ्या महत्वाच्या घडामोडी ती चाहत्यांना सांगत असते. नुकतंच तिने सोशल मीडियावर एक रील पोस्ट केले, ज्याची सगळीकडे चर्चा आहे. ऋतुजाने सोशल मीडियाच्या माध्यमातून तिला विविध पदार्थ बनवायची आवड आहे, हे सांगितले आहे. अनेकदा ती तिने बनवलेल्या पदार्थांचे व्हिडीओ आणि फोटो शेअर करत असते. आता नुकतेच तिने लालबागच्या राजाचे दर्शन घेतले आणि दर्शनासाठी जाताना बाप्पाला स्वतःच्या हाताने बनविलेले उकडीचे मोदक प्रसाद म्हणून घेऊन गेली. मोदक बनवतानाचा एक व्हिडीओ तिने सोशल मीडियावर पोस्ट केला आहे.

# अर्शदीप सिंगवर टीकेची झोड!

## विराट कोहलीने केली पाठराखण

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

सध्या यूएईमध्ये आशिया चषक स्पर्धेचा थरार सुरू आहे. सध्या सुपर-४ फेरीतील लढती सुरू असल्यामुळे प्रत्येक सामन्यात अटीतटीची लढाई पाहायला मिळत आहे. ४ सप्टेंबर रोजी झालेला भारत-पाकिस्तान सामना तर चांगलाच रोमहर्षक आणि थरारक ठरला. या सामन्यात भारताच पराभव झाला. भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने एक झेल सोडल्यामुळे सामन्याची सर्वच गणितं बदलली. दरम्यान, याच कारणामुळे त्याच्यावर टीका होत आहे. मात्र भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने त्याची पाठराखण केली आहे. अशा अटीतटीच्या सामन्यांत आणि दबावाखाली खेळताना चुका होत असतात, असे कोहली म्हणाला आहे.



### सामन्यात नेमकं काय घडलं होतं?

**४ सप्टेंबर रोजी भारत-पाक यांच्यातील सामन्यात १८ वे षटक सुरू असताना पाकिस्तानला ३४ धावांची गरज होती. यावेळी पाकिस्तानकडून खुशदील शाह आणि असिफ अली फलंदाजी करत होते. रवी बिश्नोईने टाकलेल्या चेंडूला असिफ अलीने टोलवण्याचा प्रयत्न केला. मात्र चेंडू हवेत गेला त्यामुळे अर्शदीपला हा झेल टिपण्याची चांगली संधी होती. मात्र तो झेल टिपू शकला नाही. पुढे असिफ अलीला जीवदान मिळाल्यामुळे त्याने मोठे फटके लगावले. शेवटच्या दोन षटकांत भारतीय गोलंदाज पाकिस्तानी फलंदाजांना रोखू शकले नाही आणि संघाच्या काही चुकांमुळे भारताचा पराभव झाला.**

विराट कोहलीने केली अर्शदीपची पाठराखण "कोणाकडूनही चुका होऊ शकतात. भारत-पाकिस्तान सामन्यात खुप दबाव होता.

## शॉर्ट न्यूज »

### पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारत पराभूत



**आशिया । महाईन्यूज**

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली याने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात दमदार कामगिरी केल्यानंतरही संघाचा पराभव झाल्यानंतर सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत केलेल्या एका विधानामुळे चर्चांना उधाण आलं आहे. आपण कसोटी क्रिकेटमधील कर्णधारपद सोडल्यानंतर माजी कर्णधार एम. एस. धोनी हा एकमेव अशी व्यक्ती होती जिने मला समोरुन मेसेज केला होता, असं विराट म्हणाला आहे. दक्षिण आफ्रिकेवरुद्धच्या मालिकेमध्ये सलग तीन सामन्यांमध्ये पराभूत झाल्यानंतर मागील वर्षी विराटने कसोटीचं कर्णधारपद सोडलं होतं. विराट मागील काही काळापासून सातत्यपूर्ण खेळी करण्यास अपयशी ठरत असल्याने त्याला एकदिवसीय क्रिकेटच्या कर्णधारपदावरुनही काढण्यात आलं होतं.

## ओडिशाला पहिल्या अल्टिमेट खो-खो लीगचे जेतेपद




**।पुणे। महाईन्यूज ।**

बचावातील कमालीच्या संघर्षानंतर निर्णायक क्षणात आक्रमणात चमक दाखवत ओडिशा जगरनॉट्स संघाने रविवारी पहिल्या अल्टिमेट खो-खो लीगचे विजेतेपद पटकावले. म्हाळुंगे बालेवाडी येथे झालेल्या या स्पर्धेतील अखेरच्या मिनिटापर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात ओडिशाने तेलुगु योद्धाजचे आव्हान ४६-४५ असे अवघ्या एका गुणाने परतवून लावले. संपूर्ण सामना बचावाच्या आघाडीवर खेळला गेला असला, तरी निर्णायक क्षणी 'स्काय डाईव्ह'चा गुण मोलाचा ठरला आणि सुरज लांडेने ओडिशाला विजय मिळवून दिला. सुरजने एकूण ९ गुणांची कमाई केली. त्याला रोहन शिंगाडेची साथ मिळाली. तेलुगु संघाकडून प्रतिक वाईकर, अवधूत पाटील चांगले खेळले. विजेत्या ओडिशा संघाला रोख १ कोटी, उपविजेत्या तेलुगु संघाला ५० लाख पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार रामजी कश्यपला मिळाला. सर्वोत्तम आक्रमक म्हणून अभिनंदन पाटील, तर सर्वोत्तम बचावपटू म्हणून दीपक माधवला गौरविण्यात आले. अंतिम फेरीच्या लढतीत ओडिशा आणि तेलुगु या दोन्ही संघांनी बचावावर भर दिला. पूर्वार्धात दोन्ही संघाच्या पहिल्या दोन्ही तुकड्यांनी बचावाच्या आघाडीवर चोख भूमिका बजावताना संघाची बाजू लावून धरली होती. ओडिशाने आक्रमणात एक पाऊल पुढे राखत मध्यंतराला २३-२० अशी आघाडी मिळवली होती.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही